: संशोधन विषय :

# ‘इ. स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा चिकित्सक अभ्यास’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड

पीएच. डी. मराठी पदवीसाठी

सादर केल्या जाणाऱ्या शोध निबंधाची स्थूल रुपरेषा


संशोधक

श्री शिवाजी गोविंदराव काळे

(एम. ए. बी.एड., नेट)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. लहाने गणेश रामभाऊ

मराठी विभाग प्रमुख

दयानंद वाणिज्य माहाविद्यय, लातूर

संशोधन केंद्र

दयानंद कला माहाविद्यय, लातूर


डिसेंबर २०२३

# ‘इ. स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा चिकित्सक अभ्यास’

आत्मचरित्र सूची

| | |
|---|---|
| १ अर्धविराम | यशवंतराव गडाख |
| २ संघर्षमय सफर | मोहन धारिया |
| ३ २५, ५०, ७५,आत्मचरित्र | मनोहर जोशी |
| ४ अंगारमळा | शरद जोशी |
| ५ समाज अभियंता | शंकरराव काळे |
| ६ लोक माझे सांगाती | शरद पवार |
| ७ शिवार ते संसद | राजू शेट्टी |
| ८ देह वेचावा कारणी | बाळासाहेब विखे पाटील |

# 'इ. स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा चिकित्सक अभ्यास'

प्रस्तावना :

मराठी साहित्याचा अभ्यास करताना मराठीतील विविध साहित्य प्रकारचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र, ललित गद्य यांचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये आत्मचरित्र वाङ्:मय प्रकाराचा अभ्यास करताना काळानुरूप आत्मचरित्र वाङ्:मयामध्ये बदल झालेला दिसून येतात.

प्राचीन काळापासून आत्मचित्र हा वाङ्:मय प्रकार विकसित झालेला दिसून येतो. प्राचीन काळातील त्रोटक, प्रासंगिक व नोंदीवजा आत्मकथन नामदेव-तुकारामादी संतांच्याकाव्यात व अन्य काव्य ग्रंथाच्या उपोध्दात-उपसंहारात आढळते. तुकारामांचे अभंग म्हणजे एक प्रकारचे त्यांचे अध्यात्मिक आत्मचरित्र होय.बहिणाबाई, कचेश्वर, निरंजन, रघुनाथ यासारख्या स्वतंत्र, प्रांजळ व भावोत्कट आत्मकथा काहीशा विस्तृत आहेत. वाङ्:मयीन व ऐतिहासिक महत्व असलेले गद्य आत्मचरित्रे नाना फडणीस, गंगाधर शास्त्री पटवर्धन व बापू कान्हो खांडेकर यांनी उत्तर पेशवाईत लिहिली.

आत्मचरित्रामध्ये अनुभवी व सांगण्यासारख्या विषयांचा उल्लेख बऱ्याचदा केला जातो. बऱ्याचवेळा लेखक आपल्या कुटुंबातील, सामाजिक वातावरण आणि घरगुती परिस्थितीबद्दल स्वत:शी बोलतो. साहित्य, कला, राजकारण आणि खेळ ह्यासारख्य विविध क्षेत्रात प्रसिध्द व्यक्ती आपल्या अज्ञात पैलूबद्दल आपल्या यशाची आठवणी त्याने कशा ठेवल्या आणि ते कसे प्राप्त केले याविषयी ते स्वत:चे आत्मकथा लिहितात. आत्मचरित्राचा व्यक्तीनिष्ठ स्वभाव असला तरी वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करू नये हे सर्व असूनही आत्मचरित्र व्यक्तीनिष्ठ मानले जाते. कारण ते व्यक्ती स्वत:बदल बोलते आणि हे करताना नि:पक्ष होऊ शकत नाही. स्मृतीतून आत्मचरित्राचा फरक हा आहे की, यात मोठ्या आणि दीर्घ कालावधीचा समावेश आहे.

आपल्या जीव्नाविश्यक अनुभवांचे व तादनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वत: लेखकाने लेखन रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय. विशिष्ट नियमाचे पालन करून स्वत:ची जिवन कथा सांगणे याला आत्मचरित्र असे म्हणतात.

मानवी स्वभाचे आणि जीवन दर्शविण्याचे सर्वात सामर्थ्य असणारा वाङ:मय प्रकार म्हणजे आत्मचरित्र होय. बदलत्या काळात समाजातील प्रत्येक घटक हा आत्मलक्षी बनत

चालला आहे. आपल्या अस्तित्वाची जाणीव जागृती सर्वसामान्य माणसात होऊ लागली आहे. स्वत:विषयी स्वकालीन वातावरणाविषयी सांगवे, आपल्या वाट्याला आलेले आयुष्य, त्यातील सुख-दुखे त्याला जबाबदार असणारी परीस्थीती हे इतरांसमोर मांडण्याची व आपल्या गतायुष्याला उजाळा देणारी प्रेरणा, नवीन विचार, सुधारणांनी आणि ध्येयांनी भरलेल्या या काळात अधिकच प्रकर्षाने मिळू लागली व या प्रेरणेतूनच आत्मचरित्र या साहित्य प्रकाराचे दालन समृध्द होत गेले. त्यात दलित व स्त्री आत्मचरित्रांना विषम समाजव्यवस्थेतून जे अनुभवायला आले त्या अनुभवाची धार लेखनाला प्राप्त झाली. समाजातील अनेक अनुत्तरीत प्रश्न आत्मचरित्राच्या व्यासपीठावर समोर आले.

संशोधन विषयाच्या निवडी मागील भूमिका

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यास विषयामधून राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्रातून आपल्याला त्यांच्या विविध व्यक्तिमत्वाचा अभ्यास करता येतो, त्याचबरोबर त्यांच्या जीवनातील जीवनसंघर्षाचा आढावा घेता येतो. त्यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्यासाठी हा विषय मी निवडलेला आहे.

संशोधनाचे महत्व

इ.स. सन २००० ते २०२० या काळातील राजकीय नेत्यांनी आत्मचरित्रातून साहित्यामध्ये आपले अनमोल योगदान दिलेले आहे. त्यांच्या साहित्यकृतींच्या माध्यमातून आपणाला त्यांची संस्कृती, भाषा, विचार मांडण्याची पध्दती अभ्यास करता येईल. त्यांची दृष्टी, त्यांचे अनुभव इत्यादींचा आढावा घेऊन चिकित्सकपणे अभ्यास करता येईल. संबंधित आत्मचित्राच्या माध्यमातून त्यांचे कार्य समाजा समोर आणता येईल. म्हणजेच आत्मचरित्रकाराने केलेले अनुभव कथन समाजहिताच्या दृष्टीने दिशा देण्याचे काम कसे करते हे संशोधनाच्या माध्यमातून समाजासमोर

आणता येईल.

संशोधनाची उद्दिष्टये

१. आत्मचरित्र संकल्पना व स्वरूप समजून घेणे.

२. राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा परामर्श घेणे.

३. राजकीय नेत्यांचा जीवन परिचय व कार्य समजावून घेणे.

४. राजकीय नेत्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविधांगी पैलू समजून घेणे.

५. राजकीय नेत्यांच्या जीवनातील जीवनसंघर्ष समजून घेणे.

६. राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचे वाङ्मयीन मूल्यमापन करणे.

७. आत्मचरित्रात आलेल्या व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करणे.

८. सांस्कृतिक व सामाजिक दृष्टिकोनाच्या माध्यमातून आत्मचरित्राची चिकित्सा करणे.

गृहीतके

१. राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्रात विविधांगी व्यक्तीरेखा पहावयसा मिळतात.

२. राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्रातून त्यांचे सामाजिक कार्य अभ्यासता येतील.

३. आत्मचरित्रातून व्यक्तीरेखाच्या जीवनातील संघर्ष अभ्यासावयास मिळतो.

४. राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचे गुणविशेष अभ्यासता येतील.

५. आत्मचरित्रात विविधांगी भूमिका अभ्यासता येतील.

संशोधनाची पध्दती व साधने

सदर संशोधनासाठी इ.स. २००० ते २०२० या काळातील लिहीलेल्या राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा धावता आढावा आणि त्या संबंधित प्रकाशित झालेली विविध मान्यवरांची मत-मतांतरे वृत्तपत्रामध्ये त्या संबंधित आलेले लेख, नियतकालिकामधील लेख, वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ, मासिके, दिवाळी अंक, इतर प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आणि साधनांचा वापर करण्यात येईल. त्याचबरोबर संशोधनासाठी विश्लेषण, विवेचन समिक्षापर टिकात्मक, वर्णनात्मक, ऐतिहासिक व अन्वयार्थ आत्मसंशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधनासाठी 'इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा चिकित्सक अभ्यास' या विषयांतर्गत प्रकाशित झालेले अलिकडच्या काळातील राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राच्या अभ्यासातून आलेल्या व्यक्तीरेखा, त्यांचे अनुभव कथन, व्यक्तिचित्रण इत्यादींच्या माध्यमातून सांस्कृतिक व सामाजिक दृष्टया त्यांनी घेतलेला आढावा या आत्मचरित्राच्या माध्यमातून अभ्यासावयाचा आहे.

संशोधनासाठी प्रकरण निहाय विभागणी

**प्रकरण पहिले**

आत्मचरित्र : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल

**प्रकरण दुसरे**

इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांचा जीवनपरिचय व कार्य

**प्रकरण तिसरे**

इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविधांगी पैलू,

**प्रकरण चौथे**

इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांचा आत्मचरित्रातून आलेला जीवनसंघर्ष.

प्रकरण पाचवे

इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचे वाङ्मयीन मूल्यमापन.

**प्रकरण सहावे**

निष्कर्ष आणि उपसंहार.

परिशिष्ट

१. संदर्भग्रंथ सूची

**प्रकरण पहिले**

**आत्मचरित्र : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल.**

प्रस्तुत प्रकरणात आत्मचरित्राच्या व्याख्या, संकल्पना, आत्मचरित्राचे स्वरूप, आत्मचरित्राची पूर्वपिठीका, आत्मचरित्राचा कोषगत अर्थ याचा आढावा घेण्यात येईल. त्याचप्रमाणे आत्मचरित्राची वैशिष्टये, हेतु सांगण्यात येईल. तसेच चरित्र व आत्मचरित्र यातील साम्यभेद, आत्मकथन व आत्मचरित्र यातील फरक, आत्मचरित्रातील सत्यदर्शन, आत्मचरित्रातून दिसून येणारे अनुभव विश्व, आत्मचरित्राचे महत्त्व-सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय, आर्थिक अशा विविधांगांनी प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दूसरे

इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांचा जीवनपरिचय व कार्य

आत्मचरित्राचा अभ्यास करीत असतांना साहित्यकृती लेखन करणा-या लेखकाचा सर्वांगाने अभ्यास करावा लागतो. त्यांचे जन्म, बालपण, परिस्थिती, शिक्षण, इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात येईल. तसेच लेखकावर झालेले संस्कार, त्यांच्या लेखनामागील प्रेरणा, त्यांच्या मतदार संघातील लोकांशी असलेला संपर्क व त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक इत्यादी क्षेत्रातील घटकांचा अभ्यास केला जाणार आहे व सामाजिक चळवळीतील कार्याचा अभ्यास करण्यात येईल.

**प्रकरण तिसरे**

**इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविधांगी पैलू.**

लेखकाच्या साहित्य प्रकारावर संशोधन करीत असताना ते निर्माण करणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातून विविध पैलू जाणून घेणे, संशोधन कार्याच्या यशस्वितेच्या दृष्टीने महत्वाचे असते. म्हणून या प्रकरणात आत्मचरित्र लेखन करणाऱ्या लेखकावर झालेला संस्कार, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर व लेखनावर इतरांचा पडलेला प्रभाव, त्यांच्या व्यक्तिमत्वाची झालेली जडण-घडण यांचा परामर्श घेतला जाईल. तसेच त्यांना मिळालेली पदे, सन्मान, पुरस्कार यांचाही आढावा घेण्यात येणार आहे.

आत्मचरित्रात प्रतिबिंबित झालेल्या विविध प्रदेशातील व्यक्तीचे चित्रण, माणसांचे स्वभाव वैशिष्टये, त्यांची जीवनशैली, आचार-विचार इत्यादी घटकांच्या अनुषंगाने विविध व्यक्तिमत्वाचा शोध घेण्यात येणार आहे.

**प्रकरण चौथे**

**इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांचा आत्मचरित्रातून आलेला जीवनसंघर्ष**

आत्मचरित्र लेखन करणाऱ्या लेखकांना कोणत्या प्रकारचा जीवनसंघर्ष करावा लागला याचा परामर्श या प्रकरणात घेणार आहे. राजकारण, सामाजिक चळवळीत काम करताना तसेच मतदार संघात निवडून येण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, जीवनात आलेल्या चांगल्या व वाईट अनुभवाशी सामोरे कसे जावे याचा अनुभव व संघर्ष या अनेक बाबींचा अभ्यास या घटकात केला जातो.

**प्रकरण पाचवे**

**इ.स. २००० ते २०२० या कालखंडातील निवडक राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचे वाङ्मयीन मूल्यमापन**

या प्रकरणात राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्राचा आशय-विषय, व्यक्तीचित्रण, लेखनशैली, निवेदनशैली, भाषाशैली, स्थळाचे, व्यक्तीचे, प्रसंगाचे वर्णन कौशल्य, वाङ्मयीन मूल्ये इत्यादी घटकांच्या अनुषंगाने वाङ्मयीन विशेषांचा शोध घेण्यात येईल. त्याचप्रमाणे राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्रातील वाङ्मयीन विशेषांचा शोध घेताना त्यातील अलंकारिक भाषा, प्रतिमा-प्रतिके तसेच इंग्रजी शब्दांचा शोधही घेण्यात येणार आहे.

**प्रकरण सहावे**

**निष्कर्ष आणि उपसंहार.**

या प्रकरणात शोध प्रबंधाच्या वरील पाच प्रकरणातून करण्यात आलेल्या संशोधनपर अभ्यासाचा संक्षिप्त आढावा घेण्यात येईल. तसेच वरील प्रकरणात जी सविस्तर विवेचनात्मक मांडणी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने हाती आलेल्या निष्कर्षाची नोंद या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

टीप: प्रत्यक्ष शोधकार्य करताना या विषयावरील मांडणी दरम्यान काही बदल संभवू शकतात, आवश्यक तेथे बदल करण्याची गरज भासल्यास संशोधक मार्गदर्शकाच्या सल्ल्याने व निर्देशानुसार तसा बदल करण्यात येईल.

**परिशिष्टये**

**१. संदर्भग्रंथ सूची**

१. जोशी अ.म. 'चरित्र-आत्मचरित्र', सुविचार प्रकाशन नागपूर.

२. खोले विलास, 'आत्मचरित्र व चरित्र एक चिकित्सा', साहित्य सूची.

३. गाडगीळ गंगाधर 'साहित्याचे मानदंड पॉप्यूलर प्रकाशन मुंबई

४. फडके भालचंद्र 'अलिकडची आत्मचरित्रे', महाराष्ट्र साहित्य पत्रिका पूणे.

५. कुळकर्णी द.भि. 'पंचवीस वर्षातील मराठी आत्मचरित्रे'.

६. प्रा. जाधव रा.ग. 'मराठी विश्वकोश' खंड दुसरा.

७. डॉ. कन्हाडे सदा. 'चरित्र आत्मचरित्र'

८. डॉ. भालेराव विमल 'आधुनिक मराठी बाड्मयातील स्त्रीयांची आत्मचरित्रे' साहित्य प्रसार केंद्र नागपूर.

९. मोहन यशवंत 'दलित स्वकथने ऋतुगंध, संपादक ज्योती आसटकर, नागपूर.

१०. साधले आनंद, 'आत्मचरित्राविषयो काही विचार' सत्यकथा मुंबई.

११. डॉ. लागू श्रीराम, 'लमाण' पॉप्युलर प्रकाशन पुणे.

१२. डॉ. सोमन अंजली, 'गेल्या पंचवीस वर्षातील आत्मचरित्राचा सामाजिक अभ्यास' प्रतिमा प्रकाशन पुणे.

१३. पानतावणे गंगाधर, 'अस्मितादर्श' दिवाळी अंक १९८३, (दलित आत्मकथा विशेषांक)

१४ प्रदक्षिणा ११४० ते १९६५ मराठी वाङ्मयाची चिकित्सक समिक्षा कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे.

१५. प्रा. जाधव रा.ग. 'अस्मितादर्श' दिवाळी अंक १९८३ (दलित आत्मकथा विशेषांक).

**संशोधक**

**शिवाजी गोविंदराव काळे**
**(एम. ए. बी. एड़ नेट)**

**मार्गदर्शक**

**डॉ. गणेश रामभाऊ लहाने**
**मराठी विभाग प्रमुख**
**दयानंद वाणिज्य महाविद्यालय,**
**लातूर**
**भ्रमणध्वनी :- ८२७५९४१३०३**
**Email Id :- lahanegr@gmail.com**